# श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी)

**सभा क्र. ०६/२०१०** **दिनांक ०१.०६.२०१०**

**स्थळ - समिती सभागृह,** **वेळ-सकाळी ११.०० वाजता**

**दालन क्र.६२५ (मुख्य), ६ वा मजला,मंत्रालय,मुंबई -३२**

श्रीसाईबाबा संस्थान व्यवस्थापन समितीची विशेष बैठक मंगळवार दिनांक ०१ जुन, २०१० रोजी सकाळी ११.०० वाजता समिती सभागृह, दालन क्र.६२५ (मुख्य), ६ वा मजला, मंत्रालय, मुंबई -३२ येथे आयोजित करण्यात आली असलेबाबत क्रमांक सासंवि/ बैठक२०१० / प्र.क्र.९१/ का. १६, विधी व न्याय विभाग,मंत्रालय,मुंबई - ३२ यांचे दिनांक २६ मे २०१० चे पत्रान्वये कळविण्यात आले असलेबाबत इकडील जा.नं.एसएसएस-वशी-०४-७४७५-२०१०, दिनांक २६ मे, २०१० रोजीचे पत्राने सर्व सदस्यांना कळविण्यात आले होते.

त्यानुसार सदरहू सभा मंगळवार दिनांक ०१ जुन, २०१० रोजी सकाळी ११.०० वाजता समिती सभागृह, दालन क्र.६२५ (मुख्य), ६ वा मजला, मंत्रालय, मुंबई येथे मा.अध्यक्ष श्री.जयंत मुरलीधर ससाणे यांचे अध्यक्षतेखाली सुरु करण्यात आली.

या सभेस खालील मा. सदस्य उपस्थित होते.

०१.मा.श्री जयंत मुरलीधर ससाणे,अध्यक्ष
०२. मा.श्री.शंकरराव गेणूजी कोल्हे,उपाध्यक्ष,
०३. मा.श्री.राधाकृष्ण एकनाथराव विखेपाटील
०४. मा.श्री.पांडूरंग गमाजी अभंग
०५. मा.श्री.सुरेश गोरक्षनाथ वाबळे
०६. मा.श्रीमती उर्मिला प्रदिप जाधव
०७. मा.श्री.शैलेश श्रीहरी कुटे
०८. मा.श्री.समि खतिब
०९. मा.श्रीमती रिम्पल लोहिया
१०.मा.श्री.रमाकांत गणेश कर्णिक
११. मा.कॅप्टन सुरेश वासुदेवा
१२. मा.डॉ.पी.एल.तिवारी

मा.किशोर रा. मोरे
कार्यकारी अधिकारी

**निमंत्रित- विधी व न्याय विभाग, मंत्रालय,मुंबई**

०१. मा.श्री.ल.वि सावंत, कक्ष अधिकारी,

सदरहू सभेस काही अपरिहार्य कारणास्तव उपस्थित राहू शकत नसलेबाबत मा.डॉ.एकनाथ भागचंद गोंदकर, मा.श्री अशोक भिमाशंकर खांबेकर , मा.श्री.कृष्णचंद्र श्यामसुदंर पाण्डेय व मा.सौ.जयश्री विष्णू थोरात यांनी दूरध्वनीवरुन कळविले होते. त्याची नोंद घेण्यात येऊन, समितीने त्यांना अनुपस्थित राहणेची अनुमती दिली.

यानंतर विषयपत्रिकेवरील विषयांवर चर्चा सुरु करण्यात आली.

**विषय नं.०१.** **अहमदनगर जिल्हा परिषद प्राथमिक शाळांसाठी नविन बेंचेस खरेदीसाठी प्राप्त झालेले टेंडर्स उघडून निर्णय घेणेबाबत.**

**प्रस्ताव-** अहमदनगर जिल्हयातील जिल्हा परिषद प्राथमिक शाळांमधील विद्यार्थ्यांना बसण्यासाठी बेंचेस श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांचे मार्फत उपलब्ध करुन देणेबाबत मा.व्यवस्थापन मंडळाचे दि.१४/१०/२००६ चे सभेत विषय नं. १७ निर्णय क. ८६४ नुसार रु. १०,००,००,०००/- (रु.१० कोटी) चे खर्चास मान्यता देणेत आलेली आहे.

शासन निर्णय क सांसवि २००५/८०३/(१२०)-१६ मंत्रालय, मुंबई दि.३१/०८/२००९ विधी व न्याय विभाग नुसार जिल्हा परिषद अहमदनगर यांच्या २९३४ प्राथमिक शाळा असून तेथिल विद्यार्थी संख्या १३,०३,४८५ एवढी आहे. सदर विद्यार्थ्यांसाठी बेंचेस पुरविणेसाठी आवश्यक खर्चापैकी श्री साईबाबा संस्थान विश्ववस्तव्यवस्था निधीतून रु.१०,००,००,०००/- (रु.१० कोटी) इतकी रक्कम श्री साईबाबा संस्थान विश्ववस्तव्यवस्था निधीतून खर्च करण्यास शासनाने मान्यता दिली आहे. त्यानुसार जिल्हा परिषद, अहमदनगर यांचे प्राथमिक शाळांसाठी द्यावयाचे बेंचेसची सर्व तांत्रिक माहिती संकलित करुन टेंडर फॉर्म तयार करण्यात आले. खालील ४ पुरवठाधारकांनी निविदा (टेंडर फॉर्म) भरुन जमा केले आहे.

| अ.नं. | निविदाधारकांची नांवे | आवक कमांक / दिनांक |
|---|---|---|
| ०१ | गोदरेज ॲण्ड बाईज, लि., पुणे | ८२६४/२५.०३.२०१० |
| ०२ | फिदरलाईट ऑफिस सिस्टीम प्रा.लि., मुंबई | ८२६३/२५.०३.२०१० |
| ०३ | स्टील केस, मुंबई | ८२६२/२५.०३.२०१० |
| ०४ | मे. दुराणी इंडस्टीज लि. मुंबई | मु.का.५३५/२५.०३.२०१० |

प्राप्त झालेल्या ४ निविदा उघडण्याबाबातचा विषय मा. व्यवस्थापन समितीचे दि.१८/०४/२०१० चे सभेत सादर केला होता. त्यावर सदर विषयावर चर्चा होऊन प्रथम नमुना पसंत करुन घ्यावा नंतर पुढील कार्यवाही करावी असे ठरले. वरिल ४ पुरवठा धारकांनी पाठविलेले नमुना बेंचेस मा. व्यवस्थापन समितीचे सभेत दि.२२/०५/२०१० रोजी पाहणीसाठी ठेवणेत आले होते.

निवीदाधारकांनी सादर केलेले नमुना बेंचेमध्ये नमुन्याचा तपशिल असलेले परिशिष्ट सोबत जोडले आहे.

तरी मा. व्यवस्थापन समितीचे सभेमध्ये प्राप्त निविदा उघडून निर्णय घेणेसाठी सविनय सादर.

उपरोक्तप्रमाणे प्राप्त झालेल्या चार सिलबंद निविदा आजचे सभेत समक्ष उघडण्यात येऊन निविदासादरकर्त्यांना चर्चा/ वाटाघाटीसाठी बोलविण्यात आले असता त्यांनी खालीलप्रमाणे दर देऊ केले.

| अ.नं. | निविदासादरकर्त्याचे नाव | निविदेतील दर रु. | | चर्चा/ वाटाघाटीनंतरचे दर रु. | |
|---|---|---|---|---|---|
| | | 2 Seated School Benches for Std. 1st to 4th- Quantity 29106 no. | | 2 Seated School Benches for Std. 5th to 7th- Quantity 3489 no. | |
| | | निविदेतील दर | चर्चा/ वाटाघाटी नंतरचा दर (सर्व करांसहित) | निविदेतील दर | चर्चा/ वाटाघाटी नंतरचा दर (सर्व करांसहित) |
| ०१ | गोदरेज ॲण्ड बाईज, लि., पुणे | २९०१.०० | २७८९.०० | ३२६३.०० | ३१३८.०० |
| ०२ | फिदरलाईट ऑफिस सिस्टीम प्रा.लि., मुंबई | ३१५०.०० | २७९०.०० | ३४६०.०० | ३०९०.०० |
| ०३ | स्टील केस, मुंबई | ५३८४.०० | ४३०७.०० | ५४९८.०० | ४३९८.४० |
| ०४ | मे. दुराणी इंडस्टीज लि. मुंबई | ३२०५.०० | ३२०५.०० | ३२०५.०० | ३२०५.०० |

**निर्णय क्र. ५१८ यावर सविस्तर चर्चा होऊन, २ Seated School Benches for Std. 1st to 4th- Quantity 29106 no. साठी गोदरेज ॲण्ड बाईज, लि., पुणे यांचे असलेले निम्नतम दर स्विकारणेत आले तसेच 2 Seated School Benches for Std. 5th to 7th Quantity 3489 no. यासाठी फिदरलाईट ऑफिस सिस्टीम प्रा.लि., मुंबई यांचे दर निम्नतम आहेत व गोदरेज ॲण्ड बाईज, लि., पुणे यांचे दर द्वितीय निम्नतम आहेत. परंतू गोदरेज ॲण्ड बाईज, लि., पुणे यांनी सादर केलेला बेंचेसचा नमूना फिदरलाईट ऑफिस सिस्टीम प्रा.लि., मुंबई यांचे पेक्षा अधिक चांगला असल्याने गोदरेज ॲण्ड बाईज, लि., पुणे यांचे द्वितीय निम्नतम दर स्विकारणेत येऊन, दोनही प्रकारचे बेंचेससाठी त्यांना कार्यादेश देण्यात यावा, असे ठरले.** (कार्यवाही- प्राचार्य, आय.टी.आय/अधिक्षक,खरेदी विभाग.)

---

**विषय नं.०२. मंदिर परिसर व जुने प्रसादालय परिसर पुर्नविकास करणेकामी तीन वास्तुविशारदांकडून प्राप्त झालेल्या प्रस्तावांबाबत सादरीकरण व प्रस्ताव उघडून चर्चा करुन निर्णय घेणेबाबत.**

**प्रस्ताव-** शिर्डी येथे श्री साईंच्या दर्शनार्थ येणाऱ्या साईभक्तांची गर्दी दिवसेंदिवस वाढत आहे. उत्सव काळात, तसेच सलग सुट्ट्यांचे दिवशी मंदिर परिसर व लगतचे भागात मोठ्या प्रमाणावर साईभक्तांची गर्दी होते. त्यावेळी दर्शन रांगेचे हॉल्स आणि जुन्या पिंपळवाडी रस्त्याचा दक्षिणेकडील मंदिर परिसरालगतचा निम्मा भाग पूर्ण क्षमतेने भरतो. काही प्रसंगी दर्शन रांग त्याचे बाहेर जाते. त्यासाठी संपूर्ण मंदिर परिसर आणि त्याचे उत्तरेकडील जुने प्रसादालय परिसर यांचे एकत्रीकरण, पुर्ननियोजन व पुर्नविकास करण्याचा निर्णय संस्थानतर्फे घेणेत आला आहे.

♦ **सद्यस्थिती:**

संस्थानतर्फे मौजे निमगांव कोऱ्हाळे येथे भक्तांना प्रसाद भोजन घेणेसाठी नविन भव्य असे श्री साई प्रसादालय उभारण्यात आलेले आहे. त्यामुळे प्रसादालयाची जुनी इमारत मोकळी झालेली आहे. त्यामुळे सदर जुन्या प्रसादालयाचा परिसर हा मंदिर परिसराशी संलग्न करुन त्याचा दर्शन रांग सुविधेसाठी वापर करण्याचे नियोजन आहे. या परिसराचे क्षेत्र ०२ हे ५५ आर आहे. तसेच मंदिर परिसराचे क्षेत्र ०२ हे १२ आर ०६ चौमी क्षेत्र मिळुन एकुण ०४ हे ६७ आर ०६ चौमी एवढ्या क्षेत्राचा समावेश उपरोक्त प्रकल्पात करण्यात आलेला आहे.

♦ **प्रकल्पाचे स्वरुप:**

सदर प्रकल्पात प्रामुख्याने भक्तांना सुलभरित्या व विनासायास दर्शन घेता यावे यासाठी सुमारे पंचवीस हजार व्यक्ती सामावु शकतील इतक्या क्षमतेची दर्शन रांग व्यवस्था करणेचा समावेश आहे. तसेच डोनेशन काऊंटर्स, लाडु प्रसाद, उदी वाटप केंद्र, कापड कोठी, संस्थान प्रकाशने विक्री काऊंटर्स, मोबाईल लॉकर्स, चप्पल स्टँड, व्हीआयपी लाऊंज, अभिषेक व पारायण कक्ष, सीसीटिव्ही व ध्वनीक्षेपण व्यवस्था, संरक्षण व्यवस्था, स्टोअर्स, टॉयलेट्स इत्यादी अनुषंगीक सुविधा उभारणेचा समावेश आहे. यामध्ये मंदिर परिसर व जुने प्रसादालय परिसर हे भुमिगत अथवा ओव्हरहेड मार्गाने एकमेकांना जोडण्यात येणार आहेत. सदर प्रकल्पामुळे मंदिर परिसरावर येणारा गर्दीचा ताण कमी होईल, परिसराचे सौंदर्यात भर पडेल व एकुण परिसराचे सुयोग्यरित्या व्यवस्थापन करणे सोयीचे होईल.

♦ **मा.व्यवस्थापन समितीतर्फे घेण्यात आलेले निर्णय:**

**निर्णय क्र.७३२(३९), दिनांक १९/०९/२००९:**

यावर सविस्तर चर्चा होऊन, सदरहू प्रकल्पासाठी आर्किटेक्ट संजय मोहे, बंगलोर, माथूर काप्रे ॲण्ड असोसिएटस, नवि दिल्ली, आणि शक्ती परमार असोसिएटस् मुंबई या तीन आर्किटेक्ट यांचेकडून

प्राथमिक संकल्पानात्मक आराखडे मागविण्यात यावेत. त्यासाठी त्यांना योग्य ते मानधन व इतर अनुषंगिक खर्चास मान्यता देणेत यावी, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.

**निर्णय क्र.३३५, दिनांक ०६/०३/२०१०:**

प्रस्तावात नमूद केल्याप्रमाणे सराहा कन्सल्टन्सी आणि काबरे कन्सल्टन्स् , नाशिक यांची मंदिर परिसर व जुने प्रसादालय परिसर नूतनीकरण प्रकल्पासाठी संकल्पना चित्रे व आराखडे सादर करणेसाठी नेमणूक करणेस तसेच आर्किटेक्ट शक्ती परमार, मंबई, सराहा कन्सल्टन्सी आणि काबरे कन्सल्टन्स् , नाशिक (JV) यांना संकल्पना चित्रे सादर करण्यासाठी दि. १५ एप्रिल २०१० पर्यंत वाढीव मूदत देणेस मान्यता देण्यात आली.

**निर्णय क्र.३५६, दिनांक १८/०४/२०१०:**

दिनांक ०६/०३/२०१० रोजी झालेल्या मा. व्यवस्थापन समितीचे सभेतील निर्णय क्र.३३५ मध्ये खालीलप्रमाणे दुरुस्ती करण्यात आली.

यावर सविस्तर चर्चा होऊन Joint Venture ऐवजी फक्त सराहा कन्सल्टन्सी, नाशिक यांची मंदिर परिसर व जुने प्रसादालय परिसर नूतनीकरण प्रकल्पासाठी संकल्पना चित्रे व आराखडे सादर करणेसाठी नेमणूक करणेस तसेच आर्किटेक्ट शक्ती परमार, मुंबई, सराहा कन्सल्टन्सी, नाशिक यांना सकल्पना चित्रे सादर करणेसाठी दिनांक २४ एप्रिल,२०१० पर्यंत वाढीव मूदत देण्यास मान्यता देण्यात आली.

- **प्रस्तावः**

वरीलप्रमाणे वेळोवेळी संमत करण्यात आलेल्या मा.व्यवस्थापन समितीचे निर्णयांन्वये सदरहू प्रकल्पासाठी खालिल चार आर्किटेक्ट्सकडून प्राथमिक संकल्पनात्मक आराखडे मागविण्यात आले होते.

१. आर्किटेक्ट संजय मोहे, बेंगालुरु

२. माथुर ॲण्ड काप्रे असो. प्रा.लि., नवि दिल्ली

३. शक्ती परमार ॲण्ड असो. मुंबई

४. आर्किटेक्ट अमृता पवार, सराहा कन्सल्टन्सी, नाशिक

उपरोक्त चारही आर्किटेक्टस् यांना संस्थान तर्फे सदरहू प्रकल्पासाठी आवश्यक Drawings, Objectives, Design Requirements इ. बाबत विस्तृत माहिती देणेत आली होती. संकल्पानात्मक आराखडे सादर करणेसाठी दि.२४/०४/२०१० अखेर अंतिम मूदत देणेत आलेली होती. उपरोक्त पैकी आर्किटेक्ट संजय मोहे, बेंगालुरु यांनी सदर प्रकल्पासाठी प्राथमिक संकल्पनात्मक आराखडे सादर करणेकामी त्यांचे दि.२३/०४/२०१० च्या ई-मेल नुसार असमर्थता दर्शविली आहे. विहीत मूदतीत खालील तिन आर्किटेक्ट यांनी सिलबंद संकल्पानात्मक आराखडे सादर केले आहेत.

| अ.नं. | आर्किटेक्चरल संस्थेचे नांव | आवक क्र. | दिनांक |
|---|---|---|---|
| ०१ | आर्किटेक्ट शक्ती परमार ॲण्ड असो., मुंबई | १०९२१ | २४/०४/२०१० |
| ०२ | माथुर ॲण्ड काप्रे असो. प्रा.लि., नवि दिल्ली | १०९८६ | २४/०४/२०१० |
| ०३ | आर्किटेक्ट अमृता पवार, सराहा कन्सल्टंसी, नाशिक | १११०९ | २४/०४/२०१० |

वरील तिनही आर्कीटेक्टस् यांना त्यांचे आराखडयांचे सादरीकरण करणेसाठी आजचे सभेपुढे पाचारण करण्यात आले होते. आर्किटेक्ट यांनी सादर केलेले सिलबंद आराखडे आजचे सभेत समक्ष उघडण्यात येऊन उपरोक्त तीनही आर्किटेक्ट यांनी त्यांचे आराखड्याचे सादरीकरण सभेत केले. तसेच विश्वस्तांनी विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे आर्किटेक्ट यांनी दिली.

**निर्णय क्र. ५१९ यावर सविस्तर चर्चा होऊन, मंदिर परिसर व जुने प्रसादालय परिसर पुर्नविकास प्रकल्पासाठी नियुक्त करणेत आलेल्या तीनही वास्तुविशारदांचे बांधकाम आराखडे व त्यासंबंधीत त्यांनी सादर केलेले सादरीकरण तसेच प्रस्ताव-वजा-अहवाल याचे मुंबई येथील प्रसिध्द व आमंत्रित वास्तुविशारद मे.हाफिज कॉन्ट्रॅक्टर, मुंबई अथवा तत्सम नामांकित वास्तुविशारद यांचेकडून तुलनात्मक मुल्यमापन करुन घेणेत यावे. दरम्यान वरिष्ठ मुख्य अभियंता, बांधकाम विभाग यांनी उपरोक्त तीनही प्रस्तावांचा अभ्यास करुन आपला अहवाल सादर करावा, असे ठरले.**

(कार्यवाही-बांधकाम विभागप्रमुख)

---

**विषय नं.०३. नियोजीत साई गार्डन.."बांधा, वापरा व हस्तांतरीत करा"(B.O.T.) तत्वावर उभारणी करणेकामी प्राप्त झालेले प्रस्ताव उघडून व त्यासंबंधीचे सादरीकरण पाहून त्यावर निर्णय होणेबाबत.**

**प्रस्ताव-** शिर्डी येथे श्री साईंच्या दर्शनार्थ येणाऱ्या साईभक्तांची गर्दी दिवसेंदिवस वाढत आहे. उत्सव काळात, तसेच सलग सुट्ट्यांचे दिवशी मंदिर परिसर व लगतचे भागात मोठ्या प्रमाणावर साईभक्तांची गर्दी होते. सदरहू मंदिर परिसरातील गर्दी कमी करण्याचे दृष्टीने तसेच साईभक्तांना दर्शनाव्यतिरिक्त आकर्षण केंद्र, मनोरंजनातून अध्यात्म साध्य होणेसाठी अद्यावत असे साई गार्डन उभारणेबाबत निर्णय झाला आहे.

❖ **प्रकल्पाचे स्वरुप :-**

संस्थान मालकीचे मौजे निमगांव को-हाळे हद्दीतील गट नं. १९८,१९९,२०० व २०१ क्षेत्र ८ हेक्टर २० आर. क्षेत्रामध्ये खालील बाबींचा अंतर्भाव असलेले प्रस्तावीत असे गार्डन विकसीत करणे

- ५००० भक्तांसाठी ॲम्पीथिएटर
- आर्ट गॅलरी
- लायब्ररी
- प्रसाधनगृहे
- वर्तुळाकार पदपथ
- संग्रहालय
- उपहारगृह
- ऑडिटोरियम
- दुकानगाळे
- लायटींग थिम ॲम्पीथिएटर
- रस्ते व पदपथ
- सांडपाणी प्रकल्प
- पाणीपुरवठा
- जलकुंभ व ड्रेनेज
- रेन वॉटर हार्वेस्टींग
- विद्युतीकरण व डी.जी.सेट
- उद्‌वाहने (लिफ्टस्)
- अग्नीशमन यंत्रणा
- फुड कोर्ट
- लँड स्केपिंग
- वॉटर फाऊंटन व म्युझिक गार्डन
- चिल्ड्रन प्ले एरिया
- मेडिएशन गार्डन
- थिम पार्क
- स्पिरिच्युरल गार्डन
- कियॉस्क
- पब्लिक युटीलिटी
- सेंट्रल थिम वॉटर फिचर - लेजर लाईटसह
- म्युझियम व आर्ट गॅलरी- इंटेरिअर
- थिम पार्कसाठी लाईटिंग व साऊंड साईनेज
- सुशोभिकरण, तांत्रिक व मनोरंजनात्मक सुविधा

❖ **सद्यस्थिती :-**

मा.व्यवस्थापन समितीचे दिनांक १९/०९/२००९ चे सभेतील निर्णय क्र.७३१ (८)अन्वये, आर्किटेक्ट माथूर ॲण्ड काप्रे यांचेमार्फत याकामी सविस्तर आराखडा व अंदाजपत्रक तयार केलेले आहे, त्यानुसार ३० वर्षाचे कालावधी करिता बांधा-वापरा-हस्तांतरीत करा (B.O.T.) या तत्वावर उपरोक्त नमूद केल्यानूसार साईगार्डनची निर्मिती करण्यास व याकामी वर्तमानपत्रात जाहीरात प्रसिध्द करुन बांधा-वापरा-हस्तांतरीत करा (B.O.T.) या तत्वावर साईगार्डन निर्मितीसाठी इच्छुकांकडून कालावधी, अपेक्षित खर्च, संस्थानसाठी यामधुन किती उत्पन्न मिळेल यासर्व बाबींसह सविस्तर सविस्तर प्रस्ताव मागविणेत यावेत, असे ठरले आहे. त्यानुसार सदरहू कामी वृतपत्रात व संस्थानचे संकेत स्थळावर जाहिरात प्रसिध्द करुन दि.२४/१२/२००९ अखेर पर्यंत प्रस्ताव मागविण्यात आले होते. दि.०३/१२/२००९ रोजीचे निवीदा-पूर्व बैठकीत झालेल्या चर्चेनुसार प्रस्ताव सादर करण्यांची अंतिम तारीख दि. ३१ जानेवारी, २०१० अखेर वाढविण्यात आली होती. त्यानूसार विहीत मुदतीत खालील दोन इच्छुक संस्थांनी आपले प्रस्ताव सिलबंद पाकीटात सादर केलेले आहेत.

१. अंबिका अगरबत्ती व अरोमा इंडस्ट्रीज लि; एलुरु, आंध्रा प्रदेश
२. वर्धमान ग्रुप, मंबई

वरीलप्रमाणे प्राप्त झालेले दोन संस्थांचे प्रस्ताव दि.०६/०३/२०१०रोजीचे मा.व्यवस्थापन समितीचे सभेत निर्णयार्थ सादर केला असता सदर सभेतील निर्णयानुसार उपरोक्त कामी फक्त दोनच निविदा प्राप्त झाल्याने, या निविदा न उघडता, सदर कामासाठी जादा इच्छुक निविदा सादरकर्त्यांना सहभाग घेता यावा, म्हणून निविदा मागविणेची मुदत विहीत पध्दतीने वृत्तपत्रात आणि संकेत स्थळावर जाहिरात प्रसिध्द करुन प्रस्ताव सादर करण्याची अंतिम मूदत दि.१०/०५/२०१० अखेर वाढविण्यात आली होती. त्याबाबतचे शुध्दिपत्रक वर्तमान पत्रात व संस्थानचे संकेत स्थळावर प्रसिध्द करण्यात आले होते. तसेच सदरहू कामी यापुर्वी स्वारस्य दर्शविणाऱ्या खालील इच्छुक संस्थाना दि.०५/०४/२००१० रोजीचे इकडील पत्रान्वये मूदत वाढविलेबाबत कळविण्यात आले होते.

| | | | |
|---|---|---|---|
| ०१ | अंबिका अगरबत्ती व अरोमा इंडस्ट्रीज लि; एलुरु, आंध्रा प्रदेश | ०२ | वर्धमान ग्रुप, मंबई |
| ०३ | इमेज इंजिनिअरींग, मुंबई | ०४ | प्रतिभा इंडस्ट्रीज लि., मुंबई |
| ०५ | मार्ग (Marg) लि; बंगलोर | ०६ | स्वर्ण प्रोजेक्ट, प्रा.ली., हैद्राबाद |

उपरोक्त ०६ संस्थांपैकी पुर्वी निविदा सादर केलेल्या दोनच संस्थांनी यापुर्वी सादर केलेले प्रस्तावच अंतिम असून त्यात कुठलाही बदल नसल्याचे कळविले आहे.

वरील प्रमाणे प्राप्त झालेले दोन संस्थांचे प्रस्तावाबाबत सादरीकरण करणे तसेच प्रस्तावातील Technical bid व Financial bid उघडून त्यातील Technical bid ची आर्किटेक्ट यांचेमार्फत व Financial bid ची चार्टर्ड अकौंटंट यांचे मार्फत अथवा वरील प्रमाणे प्राप्त झालेल्या संपूर्ण प्रस्तावांची या क्षेत्रातील तज्ञ सल्लागारा मार्फत तपासणी करुन त्यांचे अहवाल प्राप्त झाल्यानंतर उपरोक्त इच्छुक संस्थांना चर्चा वाटाघाटीसाठी बोलावता येईल.

तरी वरिल परिच्छेदामध्ये नमूद केलेप्रमाणे व प्राप्त झालेल्या प्रस्तावातील Technical bid व Financial bid उघडून व त्यासंबंधीचे सादरीकरण पाहून त्यावर निर्णय होणेस विनंती.

**निर्णय क्र. ५२०** **नियोजीत साई गार्डन "बांधा, वापरा व हस्तांतरीत करा"(B.O.T.) तत्वावर उभारणी करणेकामी प्राप्त झालेले दोन प्रस्तावांचे सादरीकरण आजचे सभेत सादर करण्यात आले. याबाबत सविस्तर अभ्यास करुन व्यवस्थापन समितीचे पूढील सभेत अंतिम निर्णय घेण्यात यावा असे ठरले.**

(कार्यवाही-बांधकाम विभागप्रमुख)

---

**विषय नं.०४. नांदुर्खी येथील नवीन हॉस्पीटलसाठी नेमलेले सल्लागार TCE - HOSMAC यांनी सादर केलेल्या प्राथमिक एस्टीमेटवर चर्चा व विचार विनीमय करणे आणि त्यांचे सादरीकरण पहाणे.**

**प्रस्ताव-** **अ)** श्री साईबाबा संस्थान विश्वस्त व्यवस्थेमार्फत मौजे नांदुर्खी, ता. राहाता येथील गट नं. ३३१ व ४४६ मधिल संस्थानला मिळणाऱ्या १५ हे. ८७ आर जमिनीत सुपरस्पेशालिटी आणि जनरल हॉस्पीटल उभारणेचा मा. व्यवस्थापन समितीचा मानस आहे. सदर कामाचा सविस्तर बांधकाम आराखडा तयार करणे व इतर सल्लागार सेवा पुरविणेस मा. व्यवस्थापन समितीचे दि.०७/११/२००९ रोजीचे सभेतील नि.क्र.८१० अन्वये TCE Consulting Engineers Ltd; New Delhi व Hosmac India, Pvt. Ltd; Mumbai यांची संयुक्तरित्या (JV) नेमणूक करणेत आली आहे.

**ब)** TCE व HOSMAC यांचेकडील आर्किटेक्ट व डॉक्टर्स यांनी शिर्डी येथे प्रत्यक्ष साईटची पहाणी केली असून सदरहू प्रकल्पाचे प्राथमिक एस्टिमेट सादर केले आहे. त्यानुसार नियोजीत रुग्णालय उभारणे करीता खालीलप्रमाणे खर्च अपेक्षीत असलेचे कळविले आहे.

| Sr.No | Description | Total Amount in Crors Rs. |
|---|---|---|
| 01 | General & S.S. Hospital Building | 105.75 |
| 02 | Residential Building for staff & dormetory | 40.00 |
| 03 | Canteen & Auditorium | 4.00 |
| 04 | Utilites<br>a. PHE works<br>b. Mechanical works<br>c. Electrical works<br>d. Housing Utilities | 63.25 |
| 05 | I & C and IT | 9.00 |
| 06 | External development works | 8.00 |
| 07 | Landscaping | 1.00 |
| 08 | Nursing College & Hostel | 14.00 |
| | **Grand Total of Project :**<br>( Excluding Procurement by SSST.) | **245.00** |

श्री साईबाबा संस्थान मार्फत नांदुर्खी येथे सुपरस्पेशालिटी आणि जनरल हॉस्पीटल उभारणेकामी TCE Consulting Engineers Ltd; New Delhi व Hosmac India, Pvt. Ltd; Mumbai यांनी सादर केलेले Facility mix आणि वरीलप्रमाणे प्राथमिक एस्टीमेट यांचे सादरीकरण करणेसाठी त्यांना आजचे सभेपुढे पाचारण करणेत आले आहे.

श्री साईबाबा संस्थान मार्फत नांदुर्खी येथे सुपरस्पेशालिटी आणि जनरल हॉस्पीटल उभारणेकामी TCE Consulting Engineers Ltd; New Delhi व Hosmac India, Pvt. Ltd; Mumbai यांनी सादर केलेले Facility mix आणि वरीलप्रमाणे प्राथमिक एस्टीमेट यांचे सादरीकरण आजचे सभेत करण्यात आले. तसेच सदस्यांनी विचारलेल्या प्रश्नांची उत्तर दिली.

**निर्णय क्र. ५२१** **यावर सविस्तर चर्चा होऊन, संयुक्त सल्लागार सेवा संस्थांनी सादरीकरण केलेप्रमाणे, मौजे नांदुर्खी येथे उभारणेत यावयाचे प्रस्तावित नियोजित सुपरस्पेशालिटी व जनरल हॉस्पिटलचे प्राथमिक अंदाजपत्रकास व त्यात समाविष्ट करणेत आलेल्या विविध सेवांच्या समावेशास तत्वत: मान्यता देण्यात आली. सदर प्रकल्प राबविणेसाठी सल्लागार संस्थेकडून मास्टर प्लॅन तयार करुन घेणेत यावा. सदर मास्टर प्लॅनमध्ये कामांचे नियोजन, विभाजन व त्यासाठी लागणारा कालावधी व त्यासाठी आवश्यक असणारी कार्यवाही, त्याचा अंदाजित खर्च यांचा स्पष्टपणे समावेश असावा. सदर प्रस्तावित प्रकल्पाचे स्वरुप मोठे असल्याने, प्रकल्प राबविण्याच्या व पूर्णत्वास नेणेच्या दृष्टीने कामांचे प्राधान्य गट तयार करणेत यावे. त्या प्राधान्य क्रमानुसार कामे सुरु करणेस मान्यता देणेत यावी, असे ठरले.** (कार्यवाही-बांधकाम विभागप्रमुख)

---

वरील निर्णय क्र ५१८ ते ५२१ सर्वानुमते घेण्यात आले आहेत.
यानंतर सभा समाप्तीची घोषणा करण्यात आली.

स्वाक्षरीत/-
(किशोर रा.मोरे)
कार्यकारी अधिकारी
श्रीसाईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी)

स्वाक्षरीत/-
(जयंत मुरलीधर ससाणे)
अध्यक्ष
श्रीसाईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी)